**MHSI**06-000295-2026      **सं.फौ.खटला क्र. १२६/२०२६**

**निशाणी क्र. ३**

**न्यायदंडाधिकारी वर्ग-१, सावंतवाडी यांचे न्यायालयात**

| | | |
|---|---|---|
| १. | अपराध घडल्याची तारीख | : १०/०३/२०२६ |
| २. | फिर्याद दाखल केल्याची तारीख | : १०/०३/२०२६ |
| ३. | फिर्यादीचे नाव, वय व पत्ता | : सुनिल दत्ताराम नाई, पोहवा/६४<br>नेमणुक- सावंतवाडी पोलीस ठाणे. |
| ४. | आरोपीचे नाव, वय व पत्ता | : कृष्णकुमार कमल यादव<br>वय : ३५ वर्षे, धंदा-चालक,<br>रा. पाथरा, अहीतोली,<br>जि. गोपालगंज, राज्य- बिहार. |

५. गुन्हयाचा तपशील :

ज्याअर्थी दि. १०/०३/२०२६ रोजी १२.३० वाजताचे दरम्यान मौजे सावंतवाडी हॉटेल लेक व्ह्यु ते तिनमुशी नाका येथे तुम्ही तुमच्या ताब्यातील ॲक्टीव्हा मोटार सायकल क्र. एम्. एच्.-०५/सी. एन. ९४३५ हे वाहन सार्वजनिक रस्त्यावर भरधाव वेगात, रस्त्याच्या विशिष्ट परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन, अविचाराने, हयगयीने चालविताना मिळून आलात आणि त्याद्वारे तुम्ही भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम २८१ प्रमाणे अन्वये शिक्षापात्र असलेला व या न्यायालयाचे दखलगिरीतील गुन्हा केला.

५(ब). कलम व अधिनियम :- भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम २८१ अन्वये.

**आरोपीचा जबाब-**

प्रश्न १. तुम्हाला पोलीस पेपर्सच्या नकला मिळाल्या काय?

उत्तर : होय.

प्रश्न २. तुमच्याविरुध्द दाखल केलेला गुन्हा तुम्हास मराठीतून वाचून व समजावून सांगण्यात आला तो तुम्हास समजला काय?

उत्तर : होय.

प्रश्न ३. तुम्हास गुन्हा कबूल आहे काय?

उत्तर : होय. मला गुन्हा कबूल आहे.

........................

आरोपीची सही

समक्ष,

सही/–

**(जा.म. मिस्त्री)**

**दिनांक १४/०३/२०२६** **पॅनल प्रमुख**

राष्ट्रीय लोकअदालत, सावंतवाडी

## आदेश

**(पारीत केला दि.१४/०३/२०२६)**

१. आज रोजी आरोपी माझ्यासमोर हजर झाला. त्याने अर्ज दाखल करुन गुन्हा कबूल करीत आहे असे कथन केले आहे. पुढे त्याने अर्जामध्ये कमीत कमी दंडावरती मुक्तता करण्यात यावी, अशी विनंती केली आहे. त्याने केलेला गुन्हा हा त्याचा पहिलाच गुन्हा आहे.

२. वरील सर्व बाबी विचारात घेता व आरोपीविरुध्दच्या खटल्याचे स्वरुप विचारात घेता, न्यायाचा अंतिम हेतू साध्य करण्याकरिता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१. आरोपी कृष्णकुमार कमल यादव यास भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम २७५ अन्वये भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम २८१ खालील गुन्ह्याकरिता दोषसिद्ध ठरविण्यात येत आहे.

२. आरोपीला भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम २८१ खालील गुन्ह्याकरिता रक्कम रु.५००/– (अक्षरी रुपये पाचशे फक्त) दंड भरण्याची तसेच दंड न भरल्यास १ दिवस साध्या कारावासाची शिक्षा सुनावण्यात येते.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

**दिनांक १४/०३/२०२६**

सही/–

**(श्री.एस.जे. सावंत)**

**सदस्य**

राष्ट्रीय लोकअदालत, सावंतवाडी

JAHEDA MOHMED MISTRY

Digitally signed by JAHEDA MOHMED MISTRY
Date: 2026.03.14 15:53:59 +0530

**(जा.म. मिस्त्री)**

**पॅनल प्रमुख**

राष्ट्रीय लोकअदालत, सावंतवाडी